## जोड पत्र – "अ"

## शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळणे बाबत

## (अर्जाचा नमुना)

माहिती अधिकार
फि/शुल्क
आवक पावती
करून घेतली आहे
पावती क्र. 316490
पु.न. 3165
दिनांक- 13/10/2023
पावती जोडली आहे.

प्रति,

मा. जन माहिती अधिकारी

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग (प्रभाग समिती कार्यालय क्र. ४, ५ व ६)

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा रोड पूर्व

१)अर्जदाराचे संपूर्ण नाव :- इरफान बाबुलाल सय्यद

२)अर्जदाराचे संपूर्ण पत्ता :- ए-२०२, रमेश विहार अपार्टमेंट, इंद्रलोक फेस ४, भाईंदर पूर्व – मो. ९०२९१५०३७०

३)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :- जा.क्र.मनपा/उद्यान/मिरारोड/549/2023-24 दिनांक 04/09/2023 नुसार झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्याबाबत दिलेल्या परवानगीबाबत .

४)माहितीचा विषय :-वरील प्रमाणे.

५)माहिती ज्याच्याशी संबधित असेल तो कालावधी:- १ जून २०२३ ते आज रोजी माहिती मिळेपर्यंत

६)माहितीचे वर्णन :- 1) जा.क्र.मनपा/उद्यान/मिरारोड/549/2023-24 दिनांक 04/09/2023 दिलेल्या परवानगीनुसार सदर परवानगी देण्यासाठी केलेली स्थळ पाहणी, जागेचा नकाशा, अर्जदाराचे अर्ज, झाडाचे घेतलेले छाटणी पूर्व घेतलेले छायाचित्र व स्थळ पाहणीसाठी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांची नावे देण्यात यावी. २) आपण दिलेल्या परवानगीनुसार परवानगी धारकाने ज्या अटी व शर्तींची पूर्तता केली आहे त्या अटी व शर्तींची माहिती देण्यात यावी. ३) सदर परवानगी बाबत तक्रारी प्राप्त झाल्यास तक्रारी नंतर केलेली स्थळ पाहणी व केलेल्या कारवाईचा अहवाल मिळावा

७)माहिती : व्यक्तीशा मिळावी

८)अर्जदार : दारिद्र्य रेषेखाली खाली आहे किवा नाही :- नाही

९)ठिकाण :- भाईंदर

१०)दिनांक :- १३ ऑक्टोबर २०२३

**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१७ / प्र. क्र. (२०८/१७) सहा. यानुसार माहिती देण्यात यावी.**

देण्यात येणाऱ्या माहितीचे सर्व कागदपत्राच्या साक्षांकित व सत्यप्रती सही शिक्यानिशी दयाव्यात.

अर्जदार,

Ssayyed

श्री. इरफान बाबुलाल सय्यद

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान व वृक्ष प्राधिकरण
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
आवक क्र. 04 दि. 13/10/2023
2023=24
उप. मुख्य उद्यान अधिक्षक

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

२ रा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/ ६६५ /२०२३-२४ दिनांक :१६/१०/२०२३

प्रति,
श्री.सैजात इक्बाल अली शेख
डाचकुल पाडा शंकर मंदिरच्या समोर
रोहिदास नगर
मिरारोड (पु.)

विषय :- चिंचेच्या झाडाची कत्तल केली बाबत
संदर्भ:- १) आपले दि.२९/०८/२०२३ रोजीचे पत्र.
२) जा.क्र.मनपा/उद्यान /मिरारोड /५४९/२०२३-२०२४ दि.०४/०९/२०२३ रोजीची परवानगी.
३) श्री. इरफान सय्यद (संपादक) सा.वृत्तपत्र-सत्य परिचित यांची दि.१३/०९/२०२३ रोजीची प्राप्त तक्रार.

उपरोक्त विषयान्वये, मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील डाचकुल पाडा शंकर मंदिरच्या समोर रोहिदास नगर येथिल झाडाची फांद्यी छाटणी करणेकामी संदर्भ क्र. १ अन्वये आपण या विभागास कळविलेले होते. दि.०४/०९/२०२३ रोजी सदर नमुद जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन फक्त धोकादायक वृक्षांची फांदी छाटणीकामी परवानगी देण्यात आली होती.

परंतु संदर्भ क्र. ३ च्या प्राप्त तक्रारी अन्वये सदर झाडाची पाहणी केली असता सदर झाडाची मोठया आकाराची ०१ फांदी जमिनीपासून ०३ ते ०४ फुटावर कापण्यात आल्याची दिसून आलेले आहे. आपणास देण्यात आलेल्या संदर्भ क्र. २ मधील परवानगीतील अट क्र. २,४ व ५ चा भंग केल्याचे दिसून आले आहे.

तरी सदर बाबत आपला लेखी खुलासा पत्र मिळाल्यापासून ०३ दिवसांच्या आत या विभागास सादर करावा. खुलास विहीत वेळेत सादर न झाल्यास, आपले काहीही म्हणणे नाही असे समजून आपणांवर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घेण्यात यावी.

(नागेश विरकर)
उप.मुख्य उद्यान अधिक्षक
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव:-
श्री. इरफान सय्यद (संपादक)
सा.वृत्तपत्र-सत्य परिचित
ए -२०२,रमेश विहार अपार्टमेंट
इंद्रलोक,फेस -४,भाईदर (पु.)

प्राप्त 17/10/2023

80975 71441

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

२ रा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९


जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/ ६२८ /२०२३-२४ दिनांक :-२६/०९/२०२३

ओ/सी

प्रति,
श्री. इरफान सय्यद (संपादक)
सा.वृत्तपत्र-सत्य परिचित
ए -२०२,रमेश विहार अपार्टमेंट
इंद्रलोक,फेस -४,भाईंदर (पु.)

विषय :- चिंचेच्या झाडाची कत्तल केली बाबत
संदर्भ:- १) जा.क्र.मनपा/उद्यान /मिरारोड /५४९/२०२३-२०२४
दि.०४/०९/२०२३ रोजीची परवानगी.
२) आपले दि.१३/०९/२०२३ रोजीची प्राप्त तक्रार.

उपरोक्त विषयान्वये, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील डाचकुल पाडा शंकर मंदिरच्या समोर रोहिदास नगर येथिल श्री.सैजात इक्बाल अली शेख यांनी झाडाची फांद्यी छाटणीची परवानगी घेवून झाड कापल्याबाबत संदर्भ क्र. २ नुसार आपली तक्रार या कार्यालयात प्राप्त झालेली आहे.

तथापि श्री.सैजात इक्बाल अली शेख यांना घरावर गेलेल्या फांद्याची छाटणी करणेबाबत संदर्भ क्र. १ परवानगी देण्यात आलेली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.२६/०९/२०२३ रोजी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली असता परवानगी मध्ये नमुद केल्या प्रमाणे बाजूच्या घरावर गेलेली फांद्यी कापलेली असून झाड पुर्णपणे कापण्यात आलेले नाही.

सोबत या विभागामार्फत देण्यात आलेली परवानगी ची छांयाकित प्रत जोडून देण्यात येत आहे.

(नागेश विरकर)
उप.मुख्य उद्यान अधिक्षक
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्राप्त 03/10/2023


GPS Map Camera
Mira Bhayandar, Maharashtra, India
shop no.c/2Dajkul Pada, Dajkul Pada, Mashachapada, Mira Road East, Mira Bhayandar, Maharashtra 401107, India
Lat 19.274688°
Long 72.896412°
12/09/23 05:20 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Mira Bhayandar, Maharashtra, India
shop no.c/2Dajkul Pada, Dajkul Pada, Mashachapada, Mira Road East, Mira Bhayandar, Maharashtra 401107, India
Lat 19.274694°
Long 72.896399°
12/09/23 05:20 PM GMT +05:30
Google

PRESS

# सत्य परिचित

सत्य : लोकशाहीची सर्वात मोठी शक्ति

RNI No. : MAHMAR/2022/84862

मोबाईल : 9029150370

ईमेल : satyaparichit.news@gmail.com

संपादक -इरफान बाबुलाल सय्यद

## अत्यंत तातडीचे

दिनांक : 13/09/2023

प्रति,
उद्यान अधीक्षक,
प्रभाग समिती क्रमांक ४, ५ व ६,
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
मिरा रोड पूर्व, ता. जि. ठाणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
आवक क्र. 2352 - दि. 23/09/2023

उप. मुख्य उद्यान अधिक्षक

**विषय :- सैजाद इकबाल अली शेख रा. डाचकुल पाडा, शंकर मंदिरच्या समोर काशीमीरा मीरा रोड पूर्व या व्यक्तीने चिंचेच्या झाडाच्या फांद्यांची छाटणी करण्याची परवानगी घेवून झाडाची कत्तल केल्याबद्दल**

**संदर्भ :-** १) जा.क्र.मनपा/उद्यान/मिरारोड/549/2023-24 दिनांक 04/09/2023 नुसार झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्याबाबत दिलेली परवानगी

महोदय,

आपणास उपरोक्त वरील विषयानुसार आपल्या निर्दशनास आणू इच्छितो की, सैजाद इकबाल अली शेख रा. रोहिदास नगर डाचकुल पाडा, शंकर मंदिरच्या समोर काशीमीरा मीरा रोड पूर्व या व्यक्तीने आपल्या विभागातून चिंचेच्या झाडाच्या फांद्या छाटणी करण्यासाठी **जा.क्र.मनपा/उद्यान/मिरारोड/549/2023-24 दिनांक 04/09/2023रोजी देण्यात आली होती. मात्र सैजाद इकबाल अली शेख, या व्यक्तिने चिंचेच्या झाडांच्या फांद्या छाटणी करण्यासाठी परवानगी घेवून सदर व्यक्तिने उद्यान विभागाची दिशाभूल करून सदर झाड हे अर्धवट कापून टाकले आहे, व उर्वरित झाड लवकरच काढून टाकण्यात येईल. (सोबत फोटो जोडत आहे)**

आपण लवकरात लवकर उरलेल्या झाडाचे संरक्षण करावे अन्यथा उरलेले झाड देखील मुळासकट लवकरच काढून टाकण्यात येईल कारण सदर व्यक्ती या ठिकाणी झाड काढून त्या ठिकाणी नगररचनाची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता अनधिकृत बांधकाम करण्याची शक्यता आहे. कारण यापूर्वी सदर व्यक्ती काशिमिरा परिसरात अनाधिकृत बांधकाम करत असल्याचे जग जाहीर आहे. त्यामुळे आपण प्रत्यक्षात या जागेची पाहणी करावी व झाडाची छाटणी करण्याची परवानगी घेऊन झाड कापून टाकले आहे याची शहानिशा करावी व लवकरात लवकर या व्यक्तिवर गुन्हा दाखल करावा. हि नम्र विनंती

कळावे,

इरफान सय्यद (संपादक)
साप्ताहिक वृत्तपत्र - सत्य परिचित

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४४९


जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ५४९/२०२३-२४ — दिनांक : ०४/०९/२०२३

प्रति,
श्री.सैजाद इक्बाल अली शेख
रोहिदास नगर,डाचकुल पाडा,
शंकर मंदिर च्या समोर,काशी मीरा,
मिरारोड (पु.)

o/c

**विषय -: आपल्या जागेच्या आवारातील धोकादायक फांद्यांची छाटणी करणेकामी.**
**संदर्भ -: आपले दि.२९/०८/२०२३ रोजीचे पत्र.**

संदर्भांकित प्राप्त अर्जानुसार कार्यालयिन पहाणी केली असता रोहिदास नगर,डाचकुल पाडा,शंकर मंदिर च्या समोर,काशिमीरा,मिरारोड (पु.) येथिल जागेच्या आवारातील खालिल प्रमाणे वृक्षाच्या फ़ांद्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे तेथिल रहिवाश्यांना वावरण्यासाठी धोकादायक असल्याचे दिसुन आले.

| अ.क्र. | वृक्षाचे नाव | उंची | संख्या | फ़ांद्या छाट्ण्याचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | चिंच | अंदाजे २० ते २५ फुट | ०१ | सदरचे झाड रोहिदास नगर,डाचकुल पाडा,शंकर मंदिर च्या समोर,काशिमीरा,मिरारोड (पु.) जागेच्या आवारात असून झाडांची एक फांदी बाजूच्या घराच्या छत्तावर धोकादायकरित्या अस्ताव्यस्थ वाढलेली आहेत.जोराच्या वाऱ्याने झाडांच्या फांद्या पडुन जिवीत व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.झाडांच्या फांद्याची छाटणी करुन भार कमी करणे आवश्यक आहे. या कारणास्तव सदर झाडांच्या फांदयाची छाटणी करणे आवश्यक आहे. |
| | | एकूण | ०१ | |

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन करणे अधिनियम १९७५ चे कलम ८(३)(क) अन्वये वर नमुद केल्याप्रमाणे वृक्षांच्या फ़क्त त्रासदायक /धोकादायक फ़ांद्या छाटण्यास आपणांस खालिल अटी व शर्तीस अधिन राहुन सदर परवानगी पत्र देण्यात येत आहे.

१) **त्रासदायक/ धोकादायक झाडाच्या फांदयाची/ झावळ्यांची छाटणी करणेकामी पहाणी फ्री प्रती झाड रु.३००/- याप्रमाणे ०१ झाडाचे रु.३००/-कार्यालयात भरणा करुन घेतल्यानंतर सदरच्या झाडाच्या त्रासदायक फांद्यांची छाटणी करुन घेण्यास यावी.**
२) या अधिनियमात सुचित केल्यानुसार झांडाचे जतन करणे हे मालक अथवा भोगवटादाराचे कर्तव्य असल्याने झांडाच्या मुख्य फ़ांदी/खोडास इजा अथवा तोड न करता वरिल नमुद संख्या व आकारा पेक्षा जास्त फ़ांद्याची छाटणी करता येणार नाही.
३) झांडाच्या फ़ांद्या छाटणेसाठी सदरची परवानगी १५ दिवस वैध असून त्यानंतर ही परवानगी आपोआपच व्यपगत होईल.
४) झांडाचा पर्णभार सर्व बाजुंनी संतुलित राहिल याची दक्षता घेण्यात यावी.
५) झाड संपुर्ण पर्णहिन होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक असून त्याबाबत तसे निदर्शनास आल्यास आपणा विरुद्ध कायदेशिर कारवाई करण्यात येईल.
६) इमारतीस /जीवितास फ़क्त त्रासदायक/धोकादायक ठरणा-या फ़ांद्याच तोडता येणार आहे.
७) नारळ अथवा ताड या झांडाचे बाबतीत सुकलेल्या/वाकलेल्या झावळ्या तथा फ़ळे तोडताना त्याच्या नवजात पानांस इजा होणार नाही याची जबाबदारी आपली राहिल.
८) झाडांच्या फांदयाची छाटणी करत असताना कोणतीही जिवित व वित्त हानी झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी आपली राहील.
९) झांडाच्या फ़ांद्या स्वःखर्चाने व स्वःनिर्णयाने मनुष्यबळ उपलब्ध करुन तोडुन घेणे बंधनकारक राहील.
१०) झांडाच्या तोडण्यात आलेल्या धोकादायक फ़ांद्या तथा पाला पाचोळा <u>घोडबंदर येथिल परिवहन डेपोच्या बाजूला असलेल्या महानगरपालिकेच्या आरक्षित जागेत टाकण्यात यावा.</u>तसेच रस्त्या लगत अथवा जवळील कचरा पेटीवर टाकणे अवैध आहे. तसे निदर्शनास आल्यास आपल्या विरुद्ध कायदेशिर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
११) झाडाच्या फ़ांद्या तोडताना अथवा तोडल्यानंतर् कोणत्याही नागरिकाने पुर्व परवानगी बाबत विचारणा केल्यास सदर पत्राची माहिती देणे बंधनकारक राहील.
१२) आपण वर नमुद केलेल्या अटी व शर्तीचे पालन न केल्यास तसेच वृक्ष प्राधिकरण विभाग अथवा प्राधिकृत वृक्ष अधिकारी यांच्या पुर्व परवानगीशिवाय झाड/झाडाच्या फ़ांद्या छाटणी/तोडल्याचे कृत्य केल्यास अधिनियमातील कलम २१(१) व (२) अन्वये कारवाई करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

२५
२४४२
दि ४/९/२०२३

(नागेश विरकर)
**उप.मुख्य उद्यान अधिक्षक**
**प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मिरा भाईंदर महानगरपालिका

विभाग : उद्यान विभाग

टिपणी पान क्र. --------

दि. 04/09/2023

(L) (R)

सादर,

**विषय — झाडाच्या त्रासदायक फांद्यांची छाटणी करणेबाबत**

**संदर्भ — श्री.सैजाद इक्बाल अली शेख यांचे दि.२९/०८/२०२३ रोजीचे पत्र.**

उक्त संदर्भिय पत्रामध्ये नमुद ठिकाणी दि.०४/०९/२०२३ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता रोहिदास नगर,डाचकुल पाडा,शंकर मंदिर च्या समोर,काशिमीरा,मिरारोड (पु.) येथिल ०१ नग चिंचेचे झाड असून सदर झाड अंदाजे २० ते २५ फुट उंच आहे.सदर झाडांची एक फांदी बाजूच्या घराच्या छत्तावर धोकादायकरित्या अस्ताव्यस्थ वाढलेल्या आहेत.

तथापि जोराच्या वा-याने सदर झाडाच्या फांदया/झावळयां पडुन जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सदर झाडांच्या त्रासदायक फांदयाची/झावळयांची छाटणी करण्याची परवानगी देण्यास शिफारस आहे.

हेडमाळी (दत्तात्रय गभाले)

लिपीक (शामराव इंगोले)

प्र.उद्यान अधिक्षक (गणेश गोडगे)

उप मुख्य उद्यान अधिक्षक (नागेश विरकर)

सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी (योगेश गुणिजन)


GPS Map Camera
Mira Bhayandar, Maharashtra, भारत
shop no.c/2Dajkul Pada, Dajkul Pada, Mashachapada, Mira Road East, Mira Bhayandar, Maharashtra 401107, भारत
Lat 19.274731°
Long 72.896382°
04/09/23 03:11 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Mira Bhayandar, Maharashtra, भारत
shop no.c/2Dajkul Pada, Dajkul Pada, Mashachapada, Mira Road East, Mira Bhayandar, Maharashtra 401107, भारत
Lat 19.274733°
Long 72.896369°
04/09/23 03:11 PM GMT +05:30
Google

01 ~~चिंचेचे~~ झाड
२० ते २५ फूट उंची
15 — वय

छाटणी

कार्य

सहाय्यक उद्यान अधिकारी
यां कडे मा

सदर झाड हे प्रत्यक्षपाहणी अंती चिंचेचे असून झाडाच्या फांद्या
अस्ताव्यस्त आवश्यकतेनुसार वाढलेल्या असून एक मोठी फांदी ही घरावर झुकलेली
आहे तरी ही फांदी काढण्याची आवश्यकता आहे व आजारी इतर झाडांच्या
छाटण्या प्रमाणात करण्याची आवश्यकता आहे.

(स्वाक्षरी)
४/९/२०२३



अर्जदार - सजाद इक्बाल ...

पत्ता - रोहिदास नगर, डाचकुल पाडा,

शंकर मंदिर च्या समीर, काशी मीरा,

मीरा रोड पूर्व, ठाणे ४०११०७

संपर्क क्रमांक - 7400042921

दिनांक - 29/08/23

प्रति,

वृक्ष प्राधिकरण विभाग

मीरा भाईंदर महानगरपालिका.

विषय - प्रभाग समिती ६ मधील , डाचकुल पाडा, रोहिदास नगर, या ठिकाणी असलेल्या थोकादायक असलेल्या चिंचेच्या झाडाच्या फांद्यांची छाटनी करण्यास परवानगी मिळणे बाबत.

वरील विषयावरून आपणास सांगू इच्छितो कि प्रभाग समिती ६ मधील, डाचकुल पाडा, रोहिदास नगर, या ठिकाणी असलेल्या धोकादायक चिंचेच्या झाडाच्या फांद्याची छाटनी करणे खूप महत्वाचे आहे कारण झाडांच्या फांद्या आमच्या घरावर पडून जीवित आणि वित्तहानी होण्याची शक्यता नकारता येत नाही.

तरी आपणास नम्र विनंती आहे कि सदर झाडांच्या फांद्यांची छाटनी करण्यास परवानगी द्यावी.

आपल्या माहितीसाठी सदर झाडाचा फोटो जोडला आहे.

आपला विश्वासू

सैजाद इक्बाल अली शेख

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्या. वृक्ष प्राधिकरण विभाग
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
आवक क्र. 9943 दि. 29.08.2023
2023-24
उप. मुख्य उद्यान अधिक्षक

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४६९

**जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/मा.अ./ ७८ /२०२३-२४** **दिनांक : ३०/१०/२०२३**

प्रति,
**श्री.इरफान बाबुराव सय्यद**
**ए-२०२, रमेश विहार अपार्टमेंट,**
**इंद्रलोक फेस -४**
**भाईदर (पु)**

७८

माहितीचा
अधिकार

**विषय :- केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये,**
**(जा.क्र.मनपा/उद्यान/मिरारोड/५४९/२३-२४ अन्वये दि.०४/०९/२०२३ रोजी दिलेल्या परवानगी बाबत.)**
**संदर्भ :- आपला दि.१३/१०/२०२२ रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये, **जा.क्र.मनपा/उद्यान/मिरारोड/५४९/२३-२४ अन्वये दि.०४/०९/२०२३ रोजी** दिलेल्या परवानगी बाबतची माहिती खालीलप्रमाणे :

| मुद्दा क्र. | विषय | उत्तर |
|---|---|---|
| १ | I) जा.क्र.मनपा/उद्यान/मिरारोड/५४९/२३-२४ अन्वये दि.०४/०९/२०२३ रोजी दिलेल्या परवनगी नुसार सदर परवानगी देण्यासाठी केलेली स्थळ पाहणी, जागेचा नकाशा,अर्जदाराचा अर्ज, झाडाचे छाटणी पुर्वी घेतलेले छायाचित्र | सोबत जोडत आहे. |
| | II) स्थळ पाहणी साठी उपस्थित असलेले अधिकारी कर्मचारी याची नावे | १) श्री.दत्तात्रे गभाले (हेडमाळी)<br>२) श्री. शामराव इंगोले (लिपिक)<br>३) श्री.हितेश राठोड (ठेका उद्यान अधिक्षक)<br>४) श्री.भाग्यवान साखरे ( ठेका पर्यवेक्षक)<br>५) श्री. जयेश पाटील (ठेका मजूर) |
| २ | आपण दिलेल्या परवानगी नुसार परवानगी धारकांनी ज्या अटी शर्तीची पुर्तता केली आहे त्या अटी शर्तीची माहिती | सोबत जोडत आहे. |
| ३ | सदर परवानगी बाबत तक्रार प्राप्त झाल्यास तक्रारी नंतर केलेली स्थळ पाहणी / केलेल्या पहाणीचा अहवाल | सोबत जोडत आहे. |

सदर माहितीने आपले समाधान न झाल्यास मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप.आयुक्त उद्यान विभाग मुख्य कार्यालय तिसरा मजला मिरा भाईदर महानगरपालिका यांच्याकडे ३० दिवसांच्या आत अपिल करता येईल.

Received
02/11/2023

**(नागेश विरकर)**
**जन माहिती अधिकारी तथा**
**उप.मुख्य उद्यान अधिक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**